International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.3 January – February 2024

# नाणेघाट व पांडव लेणी प्राचीन कोरीव लेख


**डॉ. अभय पाटील**

स.गा.म. कॉलेज.कराड

*Corresponding Author - डॉ. अभय पाटील*

**DOI - 10.5281/zenodo.11081959**

क्षहरात वंशाचा राजा नहपान याचा प्रसिद्ध प्राचीन कोरीव लेख. महाराष्ट्रातील नाशिक शहरापासून सु. ९ किमी. अंतरावर नैर्ऋत्य दिशेला त्रिरश्मी टेकडीवरील असलेल्या पांडव लेणी समूहात हा अभिलेख आहे. येथील लेणी क्र. १० मध्ये व्हरांड्याच्या मागील भिंतीवर छताच्या खाली पाच ओळींत कोरलेला हा अभिलेख दिसून येतो. दानपत्रात किंवा प्रस्तरलेखात राज्यकर्त्यांच्या नावाने लेख लिहिण्याची तत्कालीन पद्धत असल्यामुळे राजा नहपानाचे नाव लेखात आले आहे. त्यामुळे हा लेख नहपानाचा जावई ऋषभदत्ताने (उषवदात) कोरविला असला, तरी नहपानाच्या नावाने ओळखला जातो. लेख ब्राह्मी लिपित असून अक्षरांचे वळण घवघवीत व ठाशीव स्वरूपाचे आहे. लेखाची अक्षरे जाड असून पूर्वी गोलाकार असलेली अक्षरे कोनयुक्त व कोनयुक्त अक्षरे गोलाकार बनली आहेत. एकूण लिपीचे स्वरूप डौलदार आहे.



(नहपान विहार, पांडव लेणी, नाशिक.)

लेणी क्र. ३८ च्या लेखावरून हा लेख शक संवत् ४२ (इ. स. १२०-२१) मध्ये कोरला गेला असावा, असे वा. वि. मिराशी यांचे मत आहे. त्यांनी अक्षरांच्या आकारावरून व भाषेवरून असे अनुमान काढले आहेत की, हा सर्व लेख एकदम कोरला गेलेला नव्हता. पहिल्या दोन ओळी व तिसऱ्या ओळीचा पहिला तीन-चतुर्थांश भाग मोठ्या अक्षरांत असून तो हे लेणे खोदून झाल्यावर लागलीच कोरलेला असावा. नंतर पहिल्या परिशिष्टाचा लेख थोड्या लहान अक्षरांत कोरला आहे. नंतर त्यापेक्षाही लहान अक्षरांत कोरलेल्या दुसऱ्या परिशिष्टात ऋषभदत्ताने त्या लेण्यात राहणाऱ्या बौद्ध भिक्षूंच्या भोजनाकरिता दिलेल्या एका शेताच्या

दानाचा उल्लेख आहे. ही परिशिष्टे पहिल्या लेखानंतर दोन-तीन वर्षांत कोरविली असावी, असे त्यांनी नमूद केलेले आहे.

लेखाच्या भाषेवर प्राकृताची छाप आहे. ऋषभदत्त या नावातील 'ऋ' च्या जागी 'उ' झाला व 'ष' च्या जागी 'स' झाला. लेखाच्या पहिल्या भागाची भाषा काही अंशी अशुद्ध असलेली संस्कृत असून वाक्यरचना तृतीय पुरुषी आहे. नंतरचे पहिले परिशिष्ट प्राकृतात असून त्यातील वाक्यरचना प्रथम पुरुषी आहे. दुसरे परिशिष्टही प्राकृतात आहे, पण त्यातील वाक्यरचना पुनः तृतीय पुरुषी आहे.

या लेखात निरनिराळ्या तीर्थस्थानी ब्राह्मण व भिक्षूंना दिलेली भोजने व दाने तसेच लोककल्याणकारी कामांचा उल्लेख आहे. नहपानाने दुसऱ्या शतकाच्या प्रथमार्धात महाराष्ट्रावर राज्य केले. आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी लोकोपयोगी सार्वजनिक कामेही केली. काही कामे त्याने केली, तर काही कामे त्याने आपल्या जावयाकडून करविली.



( लेणी क्र. १० मधील नहपानाचा कोरीव लेख, पांडव लेणी, नाशिक.)

पहिल्या लेखाचा उद्देश नहपानाचा जावई व दीनीकाचा पुत्र ऋषभदत्त याने गोवर्धन नगराच्या त्रिरश्मी पर्वतात प्रस्तुत लेणे व त्यासाठी पाण्याची टाकी खोदविली, हे नमूद करण्याचा आहे. ऋषभदत्ताने केलेल्या धर्मकृत्यांचा उल्लेख केला असून त्यास 'धर्मात्मा' संबोधले आहे. त्याने तीन लाख गायी दान दिल्या; बार्णासा नदीच्या काठी सुवर्णदान केले व घाट बांधला; देव व ब्राह्मणांना सोळा गावे दान दिली; व प्रतिवर्ष लक्ष ब्राह्मणांना भोजन घालत आलेला आहे; प्रभास या पवित्र तीर्थी ब्राह्मणांचे आठ भार्यांशी विवाह लावून दिलेले आहेत; भरुकच्छ, दशपुर, गोवर्धन व शूर्पारक येथे चौसोपी घरे निवासाकरिता दान दिली; उद्याने, तलाव व विहिरी निर्माण केल्या; इबा, पारदा, दमण, तापी, करबेणा आणि दाहनुका या नद्या पार करण्याकरिता धर्मार्थ तरींची सोय केली; या नद्यांच्या दोन्ही काठांवर धर्मशाळा बांधल्या व पाणपोया घातल्या आणि पिंडीतकावड, गोवर्धन, सुवर्णमुख, शोर्पारग आणि रामतीर्थ येथे संन्याशांना (भिक्षुसंघांना) नानंगोल गावातील बत्तीस हजार नारळीची झाडे दान दिली.

पहिल्या परिशिष्ट लेखात ऋषभदत्त सांगतो की, भट्टारकाच्या (नहपान) आज्ञेवरून मी वर्षाऋतूमध्ये मालयांनी वेढा घातलेल्या उत्तमभद्रांना सोडविण्याकरिता चालून गेलो. माझ्या स्वारीच्या निर्घोषाने ते मालय पळू

लागले; तेव्हा त्यांना पकडून मी त्यांना उत्तमभद्र क्षत्रियांच्या ताब्यात दिले. नंतर मी पुष्कर क्षेत्री जाऊन स्नान केले आणि तीन सहस्र गायींचे आणि एका गावाचे दान दिले.दुसऱ्या परिशिष्टात ऋषभदत्ताने वाराहीपुत्र अश्विभूती या ब्राह्मणाकडून त्याच्या पित्याच्या मालकीचे गोवर्धन नगराच्या ईशान्य दिशेस असलेले एक शेत चार हजार कार्षापण नाणी देऊन विकत घेतले आणि ते आपल्या लेण्यात राहणाऱ्या चारी दिशांच्या भिक्षूंच्या मुख्य आहाराकरिता दान दिले, असे सांगितले आहे.प्रस्तुत लेखात अनेक नद्यांचे व स्थळांचे उल्लेख आलेले आहेत. भगवानलाल इंद्रजी यांनी बहुतेक नावांचे आधुनिक पर्याय सुचविले आहेत. बार्णासा नदी ही सध्याची बनास, इबा ही अंबिका, पारदा ही पार, दमण ही दमणगंगा, करबेणा ही कावेरी असावी, असे भगवानलाल यांनी सुचविले आहे. मिराशींच्या मते दाहानुका ही मुंबईच्या उत्तरेकडील डहाणू जवळची खाडी असावी.स्थळांच्या उल्लेखांपैकी प्रभास (काठेवाडातील सध्याचे प्रभास), भरुकच्छ (भडोच), दशपुर (माळव्यातील मंदसोर), शोपरिग (सोपारा), पोक्षर (पुष्कर) यांचा उल्लेखही या लेखात येतो. तसेच लेखात नहपान आणि दीनीक ही शक नावे आली असून उषवदात हे नाव मात्र भारतीय आहे. लेखात कार्षापणाचा उल्लेख असून ४००० हा अंक आकड्यात लिहिला आहे.

महाराष्ट्रातील एक प्राचीन पुरातत्त्वीय अवशेषांचे स्थळ. ते पुणे व ठाणे जिल्ह्यांच्या सीमेवर जुन्नर तालुक्यात जुन्नरच्या वायव्येस सुमारे २८ किमी.वर वसलेले आहे. हा घाट सुमारे ५ किमी. लांब व ८६० मी. उंच आहे. प्राचीन काळी पश्चिम आशियातून येणारा व्यापारी माल मुंबईच्या उत्तरेस असलेल्या भडोच (भरुकच्छ), सोपारा (शूर्पारक), तसेच दक्षिणेकडील कल्याण व चेऊल (चौल) या बंदरांत येत असे. या बंदरांपैकी सोपारा येथे येणाऱ्या व्यापारी मालाची वाहतूक विशेषकरून नाणेघाट खिंडीमार्गे देशावर होत असे, तसेच यात्रेकरू देशावरून कोकणात ये-जा करीत असत. सोपारा व कल्याण येथून देशावर येण्यास नाणेघाट हा अगदी जवळचा मार्ग होता. नाणेघाटापासून पुढे हा मार्ग देशावर जुन्नर-नगर-नेवासा-पैठण असा जातो. त्यामुळे नाणेघाट कोकण व देश यांस जोडणारा दुवा आहे. घाटमाथ्यावर पठार असून तेथे एक भव्य कोरीव दगडी रांजण आहे. या रांजणात पूर्वी जकातीची रक्कम जमा केली जात असल्याची शक्यता वर्तविली जाते. नाणेघाटाचे भू-राजकीय स्थान आणि त्याचा शेजारील जुन्नर या प्राचीन स्थानाशी असलेला निकटचा संबंध बघता, प्राचीन काळातील एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र म्हणून जुन्नरचे अस्तित्व दिसून येते.



(नाणेघाट)

नाणेघाट येथे, खिंडमार्गात, मुख्य लेण्यात सातवाहन वंशातील राजांचे व त्यांच्या नातेवाइकांच्या भग्न झालेल्या प्रतिमांचे अवशेष असून त्या प्रतिमांच्या वरील बाजूंस त्यांची नावे कोरलेली आहेत. येथील सातवाहन राणी नागनिका हिने केलेल्या वैदिक यज्ञांचा व दानांचा प्रदीर्घ शिलालेख दोन भिंतींवर कोरला आहे. त्यातील बरीचशी अक्षरे नष्ट झाली असली, तरी त्यातील अवशिष्ट मजकुरावरून तत्कालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीवर बराच प्रकाश पडतो. येथील मुख्य लेण्याच्या मंडपात दोन बाजूंस बाके कोरलेली असून मंडपाच्या डाव्या आणि उजव्या भिंतीवर शिलालेख कोरलेला आहे. मागील भिंतीत सातवाहन राजवंशातील सात व्यक्तींच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत त्या अशा : सिमुक सातवाहन, देवी नागनिका, श्रीसातकर्णी, कुमार भाय, महारठी त्रनकयिर, कुमार हकुश्री आणि कुमार सातवाहन. यांपैकी एका जोडपुतळयाच्या वरच्या बाजूस देवी नागनिका आणि श्रीसातकर्णी असा लेख आहे. त्यावरून ती सातकर्णींची राणी असावी, तसेच महारठी त्रनकयिर हा नागनिकेचा पिता असावा, असे वा. वि. मिराशी म्हणतात. तर शेवटचे दोन अनुक्रमे कुमार हकुश्री आणि कुमार सातवाहन हे सातकर्णी व नागनिकाचे लहान पुत्र होते आणि हे लेणे सातवाहन राजवंशाचे प्रतिमागृह असावे, असे



पुरातत्त्ववेत्त्यांचे मत आहे.

( नाणेघाट येथील एक शिलालेख.)

नाणेघाट लेण्यात कोरलेला नागनिकेचा वर उल्लेखिलेला शिलालेख ब्राह्मी लिपीत असून प्राकृत भाषेत आहे. शिलालेखाच्या अक्षरवटिकेवरून या शिलालेखाचा काळ योहान ब्यूलर, मिराशी यांसारख्या पुराभिलेखविद्यावंतांच्या मते साधारणतः इ.स.पू. दुसरे-पहिले शतक असावा. सध्या अस्तित्वात असलेला शिलालेख वीस ओळींचा असून डाव्या भिंतीवर शिलालेखाच्या दहा ओळी कोरल्या असून उर्वरित दहा ओळी उजव्या भिंतीवर कोरल्या आहेत. डब्ल्यू. एच. साईक्स याने ह्या शिलालेखाचा सर्वप्रथम उल्लेख १८३७ च्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या

नियतकालिकामध्ये केला. पुढे जेम्स प्रिन्सेप, रेव्हरंड जॉन स्टीव्हन्सन, भगवानलाल इंद्रजी, ब्यूलर, मिराशी, अजयमित्र शास्त्री, शोभना गोखले प्रभृतींनी या शिलालेखाचे वाचन करून अन्वयार्थ लावले आहेत. अंगियकुलवर्धन वंशातील त्रनकयिरनामक महारठीची कन्या नागनिका ही सातवाहन राजा पहिला सातकर्णी याची पत्नी आणि वेदिश्री राजाची व श्रीमान सती (शक्ती) याची माता होती. पतीच्या निधनानंतर नागनिकेने सातवाहन साम्राज्याची धुरा वाहिली. सम्राज्ञी नागनिकेला ज्या विशेषणांनी संबोधित केले आहे, त्यावरून राणी वैराग्यपूर्ण जीवन जगत होती, हे सिद्ध होते. या लेखाच्या प्रारंभी प्रजापती, धर्म, इंद्र, संकर्षण, वासुदेव, चंद्र, सूर्य, कुमार आणि चार दिक्पाल–यम, वरुण, कुबेर, इंद्र–यांना अभिवादन केले आहे. या शिलालेखात नागनिकेने सातकर्णी राजाबरोबर केलेल्या अनेक श्रौत यज्ञांचा –उदा., दोन अश्वमेध व एक राजसूय तसेच अग्न्याधेय, अनारंभणीय, गवामयन, भगलदशरात्र, आप्तोर्याम, अंगिरसामयन, गर्गत्रिरात्र, अंगिरसात्रिरात्र, शतात्रिरात्र इत्यादिकांचा– निर्देश आहे. या अनेक यज्ञांच्या उल्लेखावरून तत्कालीन धार्मिक स्थितीत यज्ञसंस्थेचे महत्त्व दिसून येते. या सर्व यज्ञांच्या नामनिर्देशाबरोबरच लेखात ब्राह्मणांना दिलेल्या हजारो गाई, हत्ती, घोडे, रथ, कार्षापण नाणी, सोन्या-चांदीचे अलंकार इत्यादिकांचे उल्लेख आहेत. त्यावरून तत्कालीन आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीवर प्रकाश पडतो. तसेच या शिलालेखात कार्षापण आणि प्रसर्पक या नाण्यांचा असलेला उल्लेख प्राचीन नाणकशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. याव्यतिरिक्त या शिलालेखात आकड्यांचा विपुल प्रमाणात केलेला उल्लेख बघता प्राचीन संख्याशास्त्राच्या प्रगत अवस्थेची कल्पना येते. या मार्गावरून ये-जा करणाऱ्या जनतेला सातवाहन सम्राज्ञीने केलेल्या धार्मिक कार्याची व सातवाहनांच्या समृद्धीची ओळख व्हावी, असा हा शिलालेख कोरण्याचा उद्देश असावा, असे अभ्यासकांचे मत आहे. प्राचीन ऐतिहासिक कालखंडात, या परिसरात मार्गानुक्रमण करणाऱ्या परकीय तसेच भारताच्या विविध प्रदेशांतील व्यापारी, सार्थवाह, यात्रेकरू या सर्वांवर सातवाहन राजवंशाची महानता ठसविण्यात या शिलालेखाने निश्चितच अनन्यसाधारण भूमिका बजावली.

नाणेघाटापासून सुमारे २८ किमी. अंतरावर असलेल्या जुन्नर या गावी प्रसिद्ध नाणकशास्त्रज्ञ पी. जे. चिन्मुळगुंद यांना इ. स. १९७६ मध्ये सातकर्णी आणि नागनिका यांचे चांदीचे संयुक्त नाणे एका शेतकऱ्याकडून मिळाले. त्यावर ब्राह्मी लिपीत नायनिका (नागनिका) व सिरी सातकनी (श्रीसातकर्णी) असा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे नाणेघाटापासून कोकणाकडे जाणाऱ्या मार्गावर, काही अंतरावर

असलेल्या एका पाण्याच्या टाक्यावर असलेला सातवाहन राजा वासिष्ठिपुत्र स्कंद सातकर्णीचा शिलालेख भगवानलाल इंद्रजी यांनी प्रकाशित केला आहे. या दोन्ही बाबींचा उल्लेख नाणेघाटाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण आहे. नाणेघाटातील राणी नागनिकेचा शिलालेख आणि सातवाहन राजवंशाचे प्रतिमागृह यांना प्राचीन इतिहासाचे एक विश्वसनीय साधन म्हणून अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याने नाणेघाटाला 'राष्ट्रीय महत्त्वाचे स्थळ' म्हणून घोषित केले आहे.

**संदर्भ :**


1. West E. W. & West, A. A., *Nashik Cave Inscriptions*, Bombay, 1862.
2. Senart, E., *Epigraphia Indica* (Vol. VIII), New Delhi, 1981.
3. *Gazetteer of the Bombay Presidency (Nashik)*, Vol. XVI, Government Central Press, Bombay, 1883.
4. Singh, Upender, *A History of Ancient and Early Medieval India, From the Stone Age to the 12th Century*, Pearson Education India, 2008.
5. गिरिजा शंकर प्रसाद मिश्र, *प्राचीन भारत का इतिहास*, जयपूर पब्लिशिंग हाउस, जयपूर, १९९६.
6. ढवळीकर, मधुकर केशव, *प्राचीन भारतीय नाणकशास्त्र*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७५.
7. देगलूरकर, गो. बं. *प्राचीन भारत इतिहास आणि संस्कृती*, अपरांत प्रकाशन, पुणे, २००५.
8. Banerjee, Gauranga Nath (2012). Hellenism in Ancient India. BoD – Books on Demand. ISBN 9783864034145.
9. Bhandarkar (1989). Some Aspects of Ancient Indian Culture. Asian Educational Services. p. 60. ISBN 9788120604575.
10. Southern India: A Guide to Monuments Sites & Museums, by George Michell, Roli Books Private Limited,
11. Fergusson, James, W.H. Allen &Co The cave temples of India,
12. Salomon, Richard (1998). Indian Epigraphy: A Guide to the Study of Inscriptions in Sanskrit, Prakrit, and the Other Indo-Aryan Languages. Oxford University Press, USA. pp. 88–89. ISBN 9780195099843.